# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः02.11.2024** **वारःशनिवार**

---

1. चार वर्षानंतर पूर्व लडाखच्या डेमचोकमध्ये प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवर भारत चीन सैन्याची गस्त सुरू.
2. झारखंडमधील विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यासाठी 528 उमेदवार रिंगणात
3. स्पेनमध्ये निर्माण झालेल्या पूरस्थितीत205 जणांचा मृत्यू
4. दिवाळी मुहूर्तावर मुंबई शेअरबाजार आणि राष्ट्रीय शेअरबाजार सकारात्मक वृद्धी आणि
5. मुंबईत न्यूझीलंडविरूद्ध कसोटी सामन्यात भारत पहिल्या डावात 149 धावांनी पिछाडीवर

**भारत-चीन**

पूर्व लडाख भागातील वास्तविक नियंत्रण रेषेवर भारतीय आणि चिनी सैन्यानं गस्त सुरू केली आहे. भारतीय लष्कराच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, डेमचोक परिसरात एप्रिल 2020 मध्ये उभय सैन्यात संघर्ष झाल्यानंतर सुमारे साडेचार वर्षांपासून थांबवण्यात आलेली गस्त पुन्हा सुरू करण्यात आली आहे. डेपसांगमधील गस्त लवकरच पुन्हा सुरू होईल. गेल्या महिन्यात राजकीय आणि लष्करी पातळीवरील चर्चेनंतर दोन्ही देशांचं सैन्य माघारी घेण्यावर एकमत झालं. दिवाळीच्या निमित्तानं, चुशुल मोल्डो, दौलत बेग ओल्डी, हॉट स्प्रिंग, केके पास आणि कोंगकला यासह विविध ठिकाणी भारतीय आणि चिनी सैनिकांनी काल मिठाईची देवाणघेवाण केली. दोन्ही सैन्याने तात्पुरते तंबू काढून टाकून डेपसांग आणि डेमचोक भागातील बांधकामं काढल्यानंतर गेल्या महिन्याच्या 22 तारखेला सैन्य माघारीची प्रक्रिया सुरू झाली. योजनेनुसार, भारत आणि चीननं संवेदनशील भागात गस्त घालताना पूर्वसूचना देण्याचं मान्य केलं आहे.

**झारखंड**

झारखंडमधील विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यातली अर्ज माघारी घेण्याची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. या टप्प्यासाठी बत्तीस उमेदवारांनी उमेदवारी अर्ज मागे घेतले. आता 528 उमेदवार रिंगणात आहेत. यापूर्वी या टप्प्यासाठी 634 उमेदवारांनी अर्ज दाखल केले होते. 20 नोव्हेंबर रोजी दुसऱ्या टप्प्यात 38 मतदारसंघांमध्ये मतदान होणार आहे. 13 नोव्हेंबरला पहिल्या टप्प्यात 34 मतदारसंघात मतदान होणार आहे. उमेदवारी अर्ज मागे घेतल्यानंतर पहिल्या टप्प्यात 683 उमेदवार सहभागी होणार आहेत. 23 नोव्हेंबर रोजी मतमोजणी होणार आहे.

**रेल्वे-तिकीट**

रेल्वे तिकीटाचं आगाऊ आरक्षण करण्याचे नवीन नियम लागू झाले आहेत. रेल्वेनं आगाऊ आरक्षणासाठी सध्याची वेळ मर्यादा 120 दिवसांवरून 60 दिवसांवर आणली आहे. मात्र, यावर्षी 31 ऑक्टोबरपर्यंत केलेलं सर्व

आरक्षण वैध राहणार आहे. रेल्वे मंत्रालयाच्या म्हणण्यानुसार, 61 ते 120 दिवसांच्या कालावधीसाठी केलेली सुमारे 21 टक्के आरक्षणं रद्द होत असल्याचं आढळून आल्यानंतर तिकीट आरक्षणाची मर्यादा कमी करण्यात आली.

## दिवाळी

प्रकाशाचा उत्सव असलेल्या दिवाळीच्या सणामध्ये आज बलिप्रतिपदा अर्थात विक्रम संवत्सराचा पाडवा साजरा होतो आहे. पती-पत्नीच्या नात्यात दिवाळीच्या पाडव्याचे विशेष महत्त्व असून व्यापारी वर्गाच्या नवीन आर्थिक वर्षाची सुरुवातही आजपासून होते. कृषीवलांच्या संस्कृतीमध्येही बळीराजाची आगळी महती आहे. या काळात गावागावांमध्ये लहान मोठ्या मंदिरातून कार्तिकस्नान अर्थात काकड आरतीची परंपरा जोपासली जाते. अश्विनी पौर्णिमा अर्थात कोजागिरी पौर्णिमेपासून कार्तिक पौर्णिमा म्हणजेच त्रिपुरारी पौर्णिमेच्या दरम्यान एक महिन्यांच्या कालावधीत होणाऱ्या या काकड आरतीच्या उपक्रमाच्या मध्यावरच दिवाळीचा सण साजरा होतो.तीर्थक्षेत्रात वर्षभर होणाऱ्या उपासनेचा नित्य उपचार पिढ्यानपिढ्या सुरू असणाऱ्या कार्तिक स्नानाच्या निमित्ताने गावागावांमधल्या घराघरात पोहोचतो.संतांच्या पारंपारिक रचनांचे पाठांतर, समूहातून लोक परंपरा जोपासण्याची संस्कृती यातून वाढीस लागते.दिवाळीच्या पाडव्याला गोपाळकृष्णांनी घालून दिलेली अन्नकुट अर्थात गोवर्धन पूजा सर्वत्र केली जाते.निसर्गाच्या सानिध्यात देवतेचे अस्तित्व शोधण्याचा संदेश आणि ऋतुच्या संक्रमणाच्या कालखंडात दिनचर्येत करण्याचा बदल आपोआप यातून साधतो.

## स्पेन मृत्यू

स्पेनमधे मुसळधार पावसानं आलेल्या पुरात मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांची संख्या 205 झाली आहे. स्थानिक हवामान खात्यानं वर्तवलेल्या अंदाजानुसार, पूरपरिस्थिती बिकट होण्याची शक्यता आहे. पुरात बेपत्ता झालेल्या लोकांचा बचाव पथकांकडून शोध सुरू आहे, त्यामुळे मृतांच्या संख्येत वाढ झाली. मृतांपैकी 202 व्यक्ती या सर्वाधिक प्रभावित व्हॅलेन्सिया भागातले होते. स्पेनच्या सरकारी हवामान संस्थेनं, नैऋत्य भागाला विशेषतः मुसळधार पावसानं झोडपलेल्या हुलवा प्रांतासाठी सतर्कतेचा इशारा दिला आहे. पूर्व स्पेन परिसराला पुराचा वेढा पडला असून तिथं अधिक पाऊस होण्याची शक्यता आहे. त्यामुळे या परिसराला केशरी बावटा दाखवण्यात आला आहे. या पार्श्वभुमीवर, देशभरात तीन दिवसांचा राष्ट्रीय दुखवटा पाळला जात असून सरकारी इमारतींवरील राष्ट्रध्वज अर्ध्यावर उतरवण्यात आले आहेत. पंतप्रधान पेड्रो सांचेज यांनी नागरिकांना घरीच थांबण्याचं आवाहन करत, संकट अजून टळलेलं नसल्याचा इशारा दिला आहे. स्पेनमध्ये मंगळवारी रात्री अचानक पूरस्थिती निर्माण झाली. अवघ्या काही तासांत एक वर्षापेक्षा अधिक पाऊस झाला आहे.

## बोटस्वाना राष्ट्रपती

दक्षिण अफ्रिकेतल्या बोट्सवानाचे, सहावे राष्ट्राध्यक्ष म्हणून ड्यूमा बोको यांची निवड करण्यात आली आहे. अम्ब्रेला फॉर डेमोक्रॅटिक चेंज या पक्षाचे ते उमेदवार आहे. राष्ट्रीय वाहिन्यांवर देशाचे सरन्यायाधीश टेरेन्स रानोवने यांनी ही घोषणा केली. बोत्सवानाच्या निवडणूक कायद्यानुसार, या मतदानातून संसदेत 61 सदस्य आणि 609 स्थानिक नगरसेवक निवडले जातील तसंच 31 जागा जिंकलेल्या पक्षाला विजयी घोषित केले जाईल. मतदानाची अंतिम आकडेवारी येणं बाकी असलं तरीही डेमोक्रेटिक चेंज पक्षानं संसदेत 34 जागा जिंकून आपलं स्थान पक्कं केलं आहे. सत्तारूढ पक्ष बोत्सवाना डेमोक्रेटिक पक्षाला चार जागा मिळाल्या आहेत. यापूर्वीचे

राष्ट्राध्यक्ष मोकग्वेटसी मासीसी यांनी त्यांचा पराभव मान्य केला असून, त्यांचा सत्तारूढ पक्ष सहा दशकांनंतर सत्तेवरून पायउतार होणार आहे.

**भारत-अमेरिका सराव**

भारत अमेरिका यांच्या 15व्या संयुक्त लष्करी सराव वज्र प्रहारसाठी भारतीय सैन्य दल काल रवाना झालं. हा सराव आजपासून सुरू होणार असून 22 नोव्हेंबरपर्यंत अमेरिकेत आयडाहो इथं होईल. गेल्या वर्षी हा सराव भारतात मेघालयातल्या उमरोई इथं डिसेंबरमध्ये आयोजित करण्यात आला होता. संरक्षण मंत्रालयानं दिलेल्या माहितीनुसार, संयुक्त सरावात दोन्ही देशांतले प्रत्येकी 45 जवान असतील. भारतीय लष्कराच्या तुकडीचं नेतृत्व स्पेशल फोर्स युनिट तर अमेरिकेचं प्रतिनिधित्व ग्रीन बेरेट्स करणार आहे.

**शेअर बाजार**

दिवाळीच्या मुहुर्तावर मुंबई शेअर बाजाराला काल गुंतवणूकदारांचा मोठा प्रतिसाद मिळाला. संवत 2081 च्या शुभमुहूर्तावर काल मुंबई शेअर बाजार आणि राष्ट्रीय शेअर बाजारात सकारात्मक परिणाम दिसून आले. विशेष व्यापार सत्रात काल मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक 335 अंकांने वाढून 79 हजार 724 वर बंद झाला तर राष्ट्रीय बाजार निर्देशांकांवर 99 अंकांना वाढून 24 हजार 304 वर स्थिरावला. प्री ट्रेडिंगचं विशेष व्यापार सत्र संध्याकाळी पावणेसहा ते सहा दरम्यान घेण्यात आलं.

राष्ट्रीय शेअर बाजाराच्या तीस वर्षांच्या कामकाजाच्या स्मरणार्थ अतिरिक्त आठ भाषांमध्ये मोबाईल ॲप तसंच संकेतस्थळांची सुरुवात करण्यात आली. 1994 मध्ये तीन नोव्हेंबरला राष्ट्रीय शेअर बाजारातले व्यवहार सुरू झाले होते. आसामी, बंगाली, कन्नड, मल्याळम, ओडिया, पंजाबी, तमिळ आणि तेलगू भाषांमध्ये ॲपची सुरू केल्याची माहिती राष्ट्रीय शेअर बाजाराचे संचालक आणि व्यवस्थापक आशिषकुमार चौहान यांनी दिली. त्यामुळे हे ॲंप 12 भाषांमध्ये उपलब्ध झालं आहे.

**युवा-पुरस्कार**

तरुणांना प्रोत्साहन देणाऱ्या प्रतिष्ठेच्या राष्ट्रीय युवा पुरस्कार 2022-23 साठी अर्ज करण्याचं आवाहन केंद्रीय युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्री मनसुख मांडवीय यांनी केलं आहे. हा पुरस्कार 15 ते 29 वर्ष वयोगटातल्या व्यक्ती आणि विकास, सामाजिक सेवांच्या विविध क्षेत्रात उत्कृष्ट कार्य आणि योगदानासाठी संस्थांना प्रदान केला जातो. त्यात आरोग्य, मानवी हक्कांचा प्रचार, सक्रीय नागरिकत्व आणि सामुदायिक सेवा यांचा समावेश आहे. पदक, प्रमाणपत्र आणि व्यक्तीला एक लाख रुपये तर संस्थेला तीन लाख रुपये रोख असं पुरस्काराचं स्वरुप आहे. हा पुरस्कार प्रगतीशील आणि सर्वसमावेशक भारताला चालना देणारा युवा नेतृत्वाचा उत्सव असल्याचं डॉक्टर मांडविय यांनी दिलेल्या व्हिडिओ संदेशात म्हटलं आहे.

**रोहित बल-निधन**

फॅशनविश्वातलं प्रसिद्ध व्यक्तिमत्व रोहित बल याचं काल रात्री हृदयविकाराच्या झटक्यानं निधन झालं. ते 63 वर्षांचे होते. रोहित बल दीर्घकाळापासून हृदयविकारानं ग्रस्त होते. दिल्लीच्या मेदांता रुग्णालयात ते अतिदक्षता

विभागात दाखल होते. नुकत्याच झालेल्या लॅक्मे फॅशन वीक ऑफ इंडियामध्ये व्यवसायिक फॅशन डिझायनर असलेल्या रोहित बल यांनी कायनात अ ब्लूम इन द युनिव्हर्स नावानं वस्त्राचं प्रदर्शन केलं ते शेवटचं प्रदर्शन ठरलं.

**<u>क्रिकेट</u>**

मुंबईत सुरू असलेल्या तिसऱ्या आणि शेवटच्या कसोटी क्रिकेट सामन्यात भारत न्यूझीलंडविरुद्ध पहिल्या डावात 149 धावांनी पिछाडीवर आहे. काल दिवसअखेर भारताच्या 4 बाद 86 धावा झाल्या होत्या. शुभमन गिल 31 आणि ऋषभ पंत 1 धावांवर खेळत आहेत. तत्पूर्वी न्यूझीलंडचा डाव 235 धावांवर संपुष्टात आला. भारताकडून रविंद्र जडेजानं न्यूझीलंडचे 5, तर वॉशिंग्टन सुंदरनं 4 गडी बाद केले.

# आकाशवाणीवरील राष्ट्रीय बातमीपत्र संपलं

# नमस्कार.